**महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग**
**अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ,कोल्हापूर**
**यांत्रिकी विभाग, कृष्णानगर-सातारा.**

# निविदा सूचना क्रमांक. ४ सन २०१७ – १८

**कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सातारा हे खाली दिलेल्या कामासाठी मूळ उत्पादक, त्यांचे अधिकृत प्रतिनिधी किंवा ज्यांना अशा प्रकारच्या कामाचा अनुभव आहे अशा यांत्रिकी संघटनेकडील नोंदणीकृत कर्मशाळा धारकांकडून (कंत्राटदार नोंदणी वर्ग ई अथवा त्यावरील) खाली नमूद केलेल्या कामासाठी ब-१ नमुन्यामध्ये मोहरबंद निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सातारा यांच्या कार्यालयामध्ये खालील तक्त्यातील रकाना क्र.९ मध्ये नमूद केलेल्या कालावधीत कार्यालयीन वेळेत (११.०० ते १६.००) सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध करून देण्यात येईल व मोहरबंद निविदा कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयामध्येच खालील तक्त्यातील रकाना क्र.१० मध्ये नमूद केलेल्या तारखेपर्यंत स्विकारल्या जातील आणि शक्यतो त्याच दिवशी उपस्थित पुरवठादारांसमक्ष उघडण्यात येतील.**

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत रुपये | बयाणा रक्कम रुपये | सुरक्षित ठेव रुपये | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | कंत्राटदार वर्ग | को-या निविदा नमुन्याची किंमत रुपये | को-या निविदा मिळण्याचा कालावधी | भरुन दिलेल्यानिविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | कोल्हापुर पदधतीच्या बंधा-यासाठी निर्मीती करावयाच्या एम.एस.अँगल पॅनेल कट करणे व स्किन प्लेटसह बेंडीग वेल्डिंग करणे ( मजुरीसह ) | २,९०,२८०/- | २,९००/- | रु.७,३००/- ( रोख २.५ टक्के ) रु.७,३००/- (देयकातून २.५टक्के) | ३० दिवस | ई वर्ग | रू.५००/- हस्ते किंवा रू .५५०/- पोस्टाने | ०९/०८/२०१७ पासून १८/०८/२०१७ (१६.००) पर्यंत | दि.२२/८/२०१७ (शक्य झालेस दुपारी १६.००नंतर) |

कृपया नोंद घ्या-

१) सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सातारा यांचे कार्यालयामधील नोटीस बोर्डावर लावण्यात आली आहे. विनंती केल्यास कार्यकारी अभियंतांकडून निविदा सूचना प्रत विनामूल्य मिळू शकेल. सदरची निविदा सूचना वेबसाईटवर (www.mahayantriki.com.) पाहवयास मिळेल.
२) को-या निविदा अर्जाची किंमत रोखीने किंवा मनिऑर्डर व्दारेच स्विकारण्यात येईल. चेक, डिमांड ड्राफ्ट किंवा पोस्टल ऑर्डर्स स्विकारल्या जाणार नाहीत.
३) शासन निर्णयानुसार यांत्रिकी कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र तसेच शॉप ॲक्ट/सेल्स टॅक्स/एस.एस.आय. इ. नोंदणी प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.
४) पोस्टाने पाठविलेली निविदा वेळेत मिळाली नाही अथवा गहाळ झाली तर, त्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही. मोहरबंद लिफाफा देवाण-घेवाण करण्यात खराब झाल्यास किंवा निविदा संच मिळण्यास कोणताही विलंब झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही.
५) एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.
**६)** कामाची निविदा व आवश्यक कागदपत्रे दोन स्वतंत्र लिफाफ्यामध्ये भरुन, सदर दोन्ही लिफाफे पुन्हा एका लिफाफ्यात सिलबंद करून सादर करावयाचे आहेत.

सही /-
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग,सातारा.**

e-mail: eemdsatara@g-mail.com

जा.क्र.यांविसा/लेशा-१/ब-१ निविदा/**३०३१** /सन २०१७

कार्यकारी अभियंता,यांत्रिकी विभाग,
कृष्णानगर-सातारा,यांचे कार्यालय
दूरध्वनी/फॅक्स क्र.(०२१६२) २४६०२९
दिनांक- **२९/०७/२०१७**

**प्रति,**

उपसंचालक (माहिती ),
विभागीय माहिती कार्यालय,
मध्यवर्ती इमारत, तळ मजला,
पुणे-४११ ००१.

**विषय**- निविदा सूचना प्रसिद्धी बाबत........................................

महोदय,

या कार्यालयाची निविदा सूचना सोबत पाठविण्यात येत आहे. तिचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कार्यालयाचे नांव | कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सातारा-४१५ ००३ दूरध्वनी/फॅक्स क्र. (०२१६२) २४६०२९ |
| जाहिरात कोणत्या दिनांकास प्रसिद्ध करावयाची तो दिनांक | दि. ०९/०८/२०१७ रोजी किंवा त्यापूर्वी |
| प्रसिद्धी स्वरुप | जिल्हा स्तरावर |
| किती वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध करावयाची आहे? | नियमानुसार |
| जाहिरात किती वेळा प्रसिद्ध करावयाची आहे ? | एक वेळ |
| देयक पाठविण्याचे ठिकाण | कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, सातारा-४१५ ००३ दूरध्वनी/फॅक्स क्र. (०२१६२) २४६०२९ |
| तांत्रिक मान्यता मिळाल्याचा क्रमांक व दिनांक | अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ ,कोल्हापूर यांचे पत्र क्र. १) यांमको/ताशा-४/१९८४ सन २०१७, दिनांक – ०५/०७/२०१७ |
| सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात सदर कामासाठी केलेली वित्तिय तरतूद | रु. २,९०,२८०/- |

तरी सदर निविदा प्रसिद्धीस देण्यात यावी. ही विनंती.

आपला विश्वासू,

सही /-
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग,सातारा.**

**सोबत-** निविदा सूचना ५ प्रतीत

**प्रत-** मा.अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ , कोल्हापूर यांना माहितीसाठी सविनय सादर.
सोबत- निविदा सूचना. वेबसाईटवर प्रसिद्धि देणे करीता सविनय सादर.

**प्रत-** उप अभियंता,**यांत्रिकी उपविभाग क्र.१**,२ प्रादेशिक कर्मशाळा,उरमोडी उपसा सिंचन या व वि उपविभाग सातारा, यांना माहितीसाठी रवाना. सोबत-निविदा सूचना

**प्रत-** भांडारपाल यांना माहितीसाठी व कार्यवाही साठी रवाना.
सोबत-निविदा सूचना

**प्रत-** नोटीस बोर्ड सोबत- निविदा सूचना